**अर्जदारातर्फे सरतपास ॲड. एस. एस. सावरकर/रश्मी यादव**

१३. आता मला माझे पुराव्याचे शपथपत्र दाखविण्यात आले, त्यातील मजकुर माझे विधीज्ञाने मला समजावुन सांगितला व तो खरा व बरोबर आहे व त्यानंतर मी शपथपत्रावर माझी स्वाक्षरी केली आहे. ते शपथपत्र नि. यु—११ वर आहे.

१४. आता मला नि. कं. यु—३ वरील दस्त कं. १ दाखविण्यात आले. सदरील दस्त हे दैनंदिनी तपशिलची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि. यु—१३** देण्यात येते. दस्त कं. २ हे घटनास्थळ पंचानाम्याची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—१४** देण्यात येते. दस्त कं. ३ हे विमा कंपनीचे पत्राची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—१५** देण्यात येते. दस्त कं. ४ हे वाहनाच्या आर.सी.बुकची प्रत आहे. करीता त्यास आर्टीकल—ए देण्यात येते. दस्त कं. ५ हे वाहनाचे फिटनेस सर्टीफिकेटची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—१६** देण्यात येते. दस्त कं. ६ हे वाहनाचे राष्टीय प्रपत्राची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—१७** देण्यात येते. दस्त कं. ७ हे वाहनाचे ऑथराझेशन सर्टीफिकेटची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—१८** देण्यात येते. दस्त कं. ८ हे वाहनाची पिव्हीसी सर्टीफिकेटची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—१९** देण्यात येते. दस्त कं. ९ हे अर्जदाराचा वाहन चालविण्याच्या परवान्याची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—२०** देण्यात येते. दस्त कं. १० हे अर्जदाराच्या आधार कार्डची सत्यप्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—२१** देण्यात येते. दस्त कं. ११ हे नमुना २२७—एए ची मुळ प्रत आहे. करीता त्यास **नि क्रं. यु—२२** देण्यात येते. दस्त कं. १२ ते दस्त १८ हे रूग्नालयाची मुळ कागदपत्रे आहेत. करीता त्यास संयुक्तिक **नि क्रं. यु—२३** देण्यात येते. दस्त कं. १९ व २० हे वैद्यकिय बिलाच्या मुळप्रती आहेत. करीता त्यास **नि क्रं. यु—२४ व यु—२५** देण्यात येते.

१५. यादी नि. कं. यु—१० खाली दस्त कं. १ ते ४८ वैद्यकिय बिलाच्या प्रति दाखल केलेल्या आहेत. त्यास संयुक्तिक **नि. क्रं. यु—२६** देण्यात येते. यादी नि.

क्रं. यु—१२(ए) खाली अर्जदाराचे अपंगत्वाचे प्रमाणपत्राची मुळ प्रत दाखल करण्यात आली आहे. करीता त्यास **नि. यु—२७** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासासाठी तहकुब.**

**समक्ष,**

स्वा/—

**(डी.एस. पाईकराव)**

**न्यायाधिश,**

**दिनांकः— १०/०६/२०२६.** **कामगार न्यायालय, अकोला.**